नवी आशा नवी दिशा
# सार्वमत



## घोडेगावात कांदा २८०० रुपयांपर्यंत



**नेवासा (प्रतिनिधी)–** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या घोडेगाव कांदा मार्केटमध्ये बुधवारी कांद्याची ७७ हजार ६६९ गोणी आवक झाली. भाव जास्तीत जास्त २८०० रुपयांपर्यंत निघाले.एक दोन लॉटला २९०० ते ३००० रुपये भाव मिळाला. मोठ्या कांद्याला २५०० ते २८०० रुपये, मुक्कल भारी २२०० ते २४०० रुपये, गोल्टा २९०० ते २३०० रुपये, गोल्टी १६०० ते १८०० रुपये तर हलका डॅमेज व जोड कांद्याला १४०० ते १५०० रुपये प्रतिक्विंटलचा भाव मिळाला.

## कोल्हार उपबाजारात सोयाबीन ४३११ रुपये क्विंटल

**कोल्हार (वार्ताहर)–** राहाता कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कोल्हार बुद्रुक उपबाजारात बुधवारी सोयाबीनची २ क्विंटल आवक झाली. सोयाबीन सरासरी ४३११ रुपये प्रती क्विंटल दराने खरेदी करण्यात आली. तसेच गव्हाची ११ क्विंटल आवक झाली. गहू कमीत कमी २४०० रुपये तर जास्तीत जास्त २७२१ रुपये प्रति क्विंटल दराने खरेदी करण्यात आला. गहू सरासरी २५५० रुपये प्रति क्विंटल दराने खरेदी करण्यात आला. मक्याची २ क्विंटल आवक झाली. मका सरासरी २३०० रुपये प्रती क्विंटल दराने खरेदी करण्यात आला.




## महत्त्वाचे

### श्रीरामपुरात कांदा ३००० रुपयांपर्यंत

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** श्रीरामपूर बाजार समितीत १७३४५ कांद्याच्या गोण्यांची आवक झाली असून कांद्याला ३००० रुपयापर्यंत भाव मिळाला आहे. बाजार समितीत कांदा एक नंबर कांद्याला २३०० ते ३००० दोन नंबर कांद्याला १७०० ते २३०० तीन नंबर कांद्याला ११०० ते १७०० गोल्टीला १३०० ते २२०० तर खादला ३०० ते ११०० भाव मिळाला असल्याची माहिती सभापती सुधीर नवले, सचिव साहेबराव वाबळे यांनी दिली.

### मोरयाचिंचोरे येथे महिलेस मारहाण; गुन्हा दाखल

**गणेशवाडी (वार्ताहर)–** नेवासा तालुक्यातील मोरयाचिंचोरे येथे लग्न जमवू देत नसल्याच्या संशयातून महिलेस मारहाण केल्याची घटना घडली आहे. फिर्यादी लता अनंत मोरे (वय ३२) रा. मोरयाचिंचोरे राहत्या घरासमोर उभ्या होत्या. त्याच वेळी आरोपी महेंद्र सोपान मोरे, रा. मोरयाचिंचोरे हा फिर्यादीस म्हणाला की तूच माझे लग्न जमवू देत नाही. तूच माझे लग्न मोडतेस असे म्हणत लाथाबुक्क्यांनी व काठीने मारहाण करत शिवीगाळ केली व जिवे ठार मारण्याची धमकी दिली. दाखल फिर्यादीवरून गुन्हा र नं. २५६/२०२४ भा. द. वि कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहायक फौजदार के. बी. राख करत आहेत.

# मुसळधार पावसाने नगर शहर व परिसराला झोडपले



**अहमदनगर (प्रतिनिधी) –** जिल्ह्यात एक आठवड्यापासून मान्सून दमदार बरसत असून बुधवारी दुपारी जिल्ह्यातील अनेक भागात पावसाने हजेरी लावली. दुपारी तीन वाजता नगर शहर आणि परिसरात सर्वत्र जोरदार पाऊस कोसळला. या पावसाने ओढे-नाले तुडूंब भरून वाहू लागले.

नगर शहरात दुपारपासून सुरू असलेल्या पावसामुळे अनेक ठिकाणी पाणी साचले आहे. रस्त्यावर पाणी साचल्याने वाहन चालकांना प्रवासादरम्यान कसरत करावी लागली. मोठ्या प्रमाणात झालेल्या पावसामुळे बाजारपेठेतील रस्ते पाण्याखाली गेले होते. यामुळे व्यावसायिकांसह खरेदीसाठी आलेल्या नागरिकांचे हाल झाले. गुलमोहर रस्त्यावरील आनंद शाळेसमोर एका खासगी प्लॉटमध्ये नाल्यात टाकण्यात आलेले पाईप हटवून नाल्याचा प्रवाह मोकळा करण्यात आला. प्लॉट धारकांचा विरोध डावलून अतिक्रमण निर्मूलन विभागाच्या पथकाने पोलीस बंदोबस्तात जेसीबीच्या सहाय्याने नाल्यातील पाईप हटवले. मृग नक्षत्र सुरू होताच दुष्काळी परिस्थितीचे चटके सोसलेला नगर तालुका मृगाच्या सरींनी सुखावला. बुधवारी सलग तिसऱ्या दिवशी तालुक्यातील विविध भागात दमदार पावसाने हजेरी लावली. केडगाव, चास, कामरगाव, भोयरे पठार, भोरवाडी, अकोळनेर, सारोळा कासार तसेच जेऊर, इमामपूर, बहिरवाडी, ससेवाडी आदी भागात जोरदार पावसाची बॅटींग झाली. तालुक्यात सर्वत्र पेरणीयोग्य पाऊस झाला असल्याने बळीराजा सुखावला आहे. दरम्यान नगर तालुक्यातील ससेवाडीत ढगफुटी झाल्याने सीना नदीला पूर आला होता. जेऊर बाजारतळ पाण्यात गेले आहे.

## सशस्त्र दरोड्याच्या तयारीत असणारी टोळी पकडली

### संगमनेर शहर पोलिसांची कारवाई; चौघे ताब्यात, दोघे पसार

**संगमनेर (प्रतिनिधी)–** सशस्त्र दरोडा घालण्याच्या तयारीत दबा धरून बसलेल्या राहाता तालुक्यातील चौघा दरोडेखोरांच्या मुसक्या आवळण्यात संगमनेर शहर पोलिसांना यश आले आहे. तर दोघे पसार झाले आहेत. ताब्यात घेण्यात आलेल्या चौघांमध्ये तिघे अल्पवयीन असून त्यांच्याकडून दरोड्यासाठी लागणाऱ्या हत्यारांसह कार व दोन मोबाईल संच असा एकूण ३ लाख २७ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याबाबत शहर पोलिसांकडून मिळालेल्या अधिक माहितीनुसार बुधवारी (दि. १२ जून) पहाटे साडेचारच्या सुमारास पुणे नाक्यावरील हिंदू स्मशानभूमीजवळ ही कारवाई करण्यात आली. रात्रीची गस्त घालणाऱ्या शहर पोलिसांच्या वाहनाला या परिसरातील एका चिंचेच्या झाडाजवळ संशयास्पद हालचाल दिसल्याने काहीवेळ निरीक्षण केल्यानंतर झाडाखाली उभ्या करण्यात आलेल्या आलेल्या एका कारसह त्यालगत काहीजण दबा धरून बसल्याचे पोलिसांना दिसून आले. त्यावरून पोलिसांनी तत्काळ तेथे धाव घेतली. मात्र पोलीस येत असल्याचे पाहून त्यातील दोघे तेथून पसार झाले, तर उर्वरीत चौघांना पकडण्यात पोलिसांना यश आले.

यावेळी त्यांच्यासोबत असलेल्या कारमध्ये (क्र.एम.एच.०२, बी.झेड.५२२३) लोखंडी गज, कोयता, चाकू, करवत, लाकडी दांडके, पक्कड व दोन मोबाईल असा एकूण ३ लाख २७ हजार रुपयांचा मुद्देमाल मिळाला.

याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल हरिश्चंद्र बांडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शहर पोलिसांनी भादंवि कलम ३९९, ४०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून सार्थक उर्फ बबलू अनिल निकाळे (रा. आंबेडकर नगर, राहाता) याला ताब्यात घेत अटक केली आहे. तर १६ वर्ष सात महिने वयाचा दहेगाव (ता. राहाता), १७ वर्ष पाच महिने वयाचा आंबेडकरनगर (ता. राहाता) व १७ वर्ष सहा महिने वयाच्या पिंपळगाव जलाल (ता. येवला) येथील तिघा अल्पवयीन दरोडेखोरांना अहमदनगरच्या बाल न्यायालयासमोर हजर केले जाणार आहे. यातील दोघे पसार झाले आहेत. तर यातील अटक झालेल्या एकमेव आरोपीला न्यायालयात हजर करून कोठडी मागितली जाणार आहे.

## आश्वी परिसराला वादळी वाऱ्यासह पावसाने झोडपले

### शेतकऱ्यांचे नुकसान, शेडचे पत्रे उडाले, वीजपुरवठा खंडित



शिबलापूर येथील एकनाथ सखाराम नागरे यांच्या राहत्या घराचे तसेच रोहित्र दुरुस्तीच्या वर्कशॉपचे साधारण ७ ते ८ लाख रुपयांचे नुकसान झाले. त्यामुळे प्रशासनाने तातडीचे पंचनामे करावेत, अशी विनंती सरपंच प्रमोद बोंद्रे, प्रकाश शिंदे, गंगा म्हस्के, डॉ. नितीन काळेबाग आदींनी केली आहे.

**आश्वी (वार्ताहर)–** काल बुधवारी दुपारनंतर अचानकपणे आलेल्या वादळीवाऱ्यासह पावसाने आश्वी बुद्रुक, आश्वी खुर्द, उंबरी बाळापूर, शेडगाव, ओझर, माळेवाडी, शिबलापूर आणि परिसराला चांगलेच झोडपले. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे मोठे नुकसान झाले असून अनेक घरांचे पत्रे उडाले आहेत. तर वृक्ष उन्मळून पडले असून वीजपुरवठा खंडित झाला आहे.

बुधवारी सकाळपासूनचं आश्वीसह परिसरात वातावरण दमट झाले होते. त्यामुळे पाऊस येण्याची शक्यता होती. दुपारनंतर अचानक सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. अर्धा ते पाऊण तास झालेल्या पावसाने रौद्ररुप धारण केल्याने आश्वी बुद्रुक, आश्वी खुर्द, उंबरी बाळापूर, शेडगाव, ओझर, शिबलापूर, प्रतापपूर परिसरात अनेक झाडे उन्मळून पडली. दरम्यान या वादळी पावसामुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या शेती पिकाचे देखील नुकसानीसह शेडचे पत्रे उडाले तर विजेचे खांब देखील वाकले असल्याची माहिती मिळाली आहे. परिसरातील गावांचा वीजपुरवठा खंडित झाला आहे.

## जरांगे यांना पाठिंब्यासाठी मक्तापुरात लाक्षणिक उपोषण




**नेवासा फाटा (प्रतिनिधी)–** मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्यासाठी अहोरात्र विविध मार्गाने प्रयत्न करणारे मनोज जरांगे पाटील यांनी नुकतेच उपोषण सुरू केलेले आहे. त्यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी नेवासा तालुक्यातील मक्तापूर येथे गणेश झगरे यांनी एक दिवसाचे उपोषण केले.

मक्तापूर ग्रामपंचायत कार्यालयासमोर झालेल्या लाक्षणीक उपोषणासाठी गावातील ग्रामस्थांनी पाठिंबा दिला. गणेश झगरे म्हणाले, सरकारने आरक्षणाचा निर्णय घेतला नाही तर तालुकाभर आंदोलन करण्याची दिशा ठरवणार आहोत. यावेळी उपस्थित तंटामुक्त अध्यक्ष दत्ताभाऊ कांगुणे, पोलीस पाटील अनिल लहारे, सरपंच सुशीलाताई लहारे, गोरक्षनाथ नवघरे, मार्केट कमिटी संचालक भरत काळे, दीपक बर्डे, मनोज झगरे, दीपक शिंदे, राहुल जामदार, राहुल लहारे, विशाल कर्डक, संभाजी पोपटराव बर्डे आदी मक्तापूर ग्रामस्थ उपस्थित होते.

## नेवासा तालुक्यात वादळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करा

### खासदार वाकचौरे यांचा तहसीलदारांना आदेश

**नेवासा फाटा (प्रतिनिधी)–** मान्सूनच्या पावसाने नेवासा तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात हजेरी लावली. पाऊस सुरू असताना विजेच्या कडकडाटासह वादळी वारे वाहिले. त्यामुळे काही भागातील शेतकऱ्यांच्या शेती पिकाचे, फळ पिकांचे नुकसान झाल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांनी नवनियुक्त खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्याकडे फोनवर केल्या.

त्याची दखल घेऊन नेवासाचे तहसीलदार संजय बिरादार यांना लागलीच फोन करून ज्या-ज्या गावी शेतकऱ्यांच्या फळ पिकांची व इतर पिकांचे नुकसान झालेले आहे त्यांचे तलाठ्यांमार्फत त्वरित पंचनामे करावेत, असे आदेश दिले असल्याची माहिती खासदार वाकचौरे यांचे स्वीय सहाय्यक बाळासाहेब सोनवणे यांनी दिली.

खासदार वाकचौरे विजयी झाल्याचे कुठेही सत्कार स्वीकारणार नसून ज्या ठिकाणी शेतकऱ्यांना नैसर्गिक झळ पोहचलेली आहे, त्यांच्या समक्ष भेटी घेऊन तलाठ्यांमार्फत नुकसान भरपाई झाल्याचे पंचनामे करावेत हीच प्रथम धारणा असून त्यांना झालेली नुकसानीची मदत मिळवून देण्याचे प्रथम कर्तव्य राहील असे त्यांनी सांगितले.

## श्रीरामपुरात मुसळधार पाऊस



श्रीरामपुरात मुसळधार पावसाने हजेरी लावली. (छाया- अनिल पांडे)

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** श्रीरामपूर तालुक्याला काल मुसळधार पावसाने झोडपून काढले. अनेक भागातील खरिपाच्या नुकत्याच पेर झालेल्या पिकांना या पावसाने जीवदान मिळाले आहे. तर शहरातील रस्त्यावर पाणीचपाणी साचले होते. तर सखल भागातही पाणी साचले होते.

राज्यामध्ये मान्सूनचे आगमन झाल्यानंतर समाधानकारक पावसाने हजेरी लावली आहे. काल पुन्हा सायंकाळी तालुक्याचा काही भाग वगळता मुसळधार पाऊस झाला. तालुक्यातील कारेगाव, मालुंजा, मातापूर, खंडाळा, उक्कलगाव, बेलापूर, पढेगाव, कान्हेगाव आदी ग्रामीण भागात समाधानकारक पाऊस झाला. या पावसाने खरिपाच्या नुकत्याच पेर केलेल्या पिकांना जीवदान मिळणार आहे. सुमारे दोन तास चाललेल्या पावसाने ग्रामीण भागातील सखल भागात मोठ्या प्रमाणावर पाणी साचले होते. तर शहरातही अनेक सखल भागात पाणीचपाणी झाले होते. या खरीप हंगामात तालुक्यात कपाशीचा पेरा वाढला आहे. तर सोयाबीनचे क्षेत्र कमी झाले आहे. मक्याचा पेराही मागील वर्षीच्या तुलनेत वाढला आहे. त्यामुळे कालच्या झालेल्या पावसाने तालुक्यात खरिपाच्या पेरणीला आता वेग येणार आहे. त्यामुळे बळीराजामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. थोडाफार पाऊस आला की वीजपुरवठा गायब होणे ही नित्याचीच बाब बनली आहे. काल सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास पाऊस सुरू झाला. लगेचच महावितरणचा वीजपुरवठाही खंडित झाला. रात्री उशिरापर्यंत वीज गायबच होती. त्यामुळे शहरातील तसेच ग्रामीण भागातील नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते.

## श्रीरामपुरात मुख्याध्यापिकेला लाच घेताना रंगेहाथ पकडले

### फरकाची रक्कम मिळवून देण्यासाठी मदत केल्याचा मागितला मोबदला

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** श्रीरामपूर शहरातील एका शाळेच्या मुख्याध्यापिकेला ४५ हजार रुपयांची लाच घेताना नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

याबाबत माहिती अशी की, तक्रारदार यांची पत्नी सौ. सुभद्राबाई बाबुराव गायकवाड प्राथमिक शाळा येथे उप-शिक्षिका म्हणून कार्यरत आहे. तक्रारदार यांच्या पत्नीची सन २०१५ ते २०२२ या कालावधीतील वरिष्ठ वेतन श्रेणीच्या फरकाची रक्कम १ लाख ६२ हजार ३६७ रुपये मिळाली. तक्रारदार यांच्या पत्नीस वरिष्ठ वेतन श्रेणीचे फरकाच्या बिलाचे काम करून देण्यासाठी केलेल्या मदतीच्या मोबदल्यात सौ. सुभद्राबाई बाबुराव गायकवाड प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती संगीता नंदलाल पवार (वय ५३) यांनी ५० हजार रुपये लाचेची मागणी केली होती. याप्रकरणी त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अहमदनगर यांच्याकडे तक्रार केली होती.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने काल दि. १२ जून रोजी सौ. सुभद्राबाई बाबुराव गायकवाड प्राथमिक शाळा येथे संगीता पवार यांनी तक्रारदार यांच्याकडे पंचासमक्ष ५० हजार रुपयांची लाच मागणी करून तडजोडीअंती ४५ हजार रुपयांची लाच मागितली. ठरलेल्यानुसार शंकरराव गायकवाड ग्रामीण एज्युकेशन संस्था संचलित सुभद्रा मुलींचे वसतिगृह, श्रीरामपूर येथे लोकसेविका पवार यांच्याविरुद्ध सापळा लावण्यात आला. दरम्यान पवार यांनी यातील तक्रारदाराकडून पंचासमक्ष ४५ हजारांची लाचेची रक्कम स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू होती. सदर कामगिरी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपाधिक्षक प्रवीण लोखंडे, पोलीस अंमलदार बाबासाहेब कराड, किशोर लाड, वैशाली शिंदे, चालक हरूण शेख यांनी पार पाडली.




नवी आशा नवी दिशा सार्वमत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक राजेंद्र कृष्णराव सोनवणे यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि. यांच्याकरिता प्लॉट क्र. एन.११, एम.आय.डी.सी, अहमदनगर येथे मुद्रित करुन प्लॉट क्र. एन. ११, एम.आय.डी.सी, अहमदनगर ४१४१११ येथे प्रसिध्द केले आहे. ● संपादक- ✻ अनंत सा. पाटील : ☎ (०२४२२) २२२४६४,२२२६२९. फॅक्स : २२२७९४. अहमदनगर कार्यालय : ☎ (०२४१) २४३११०३/०४ फॅक्स : (०२४१) २४३११०५. R.N.I Regi. No. 31816/1976. पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. रजि. नं. बी.आय.आय./आर.एन.पी./एस.आर.पी./००३/२०२१-२३ (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे)